# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org

23/30

क्र. मजनिप्रा/२०१२/PLN/PRCL/७९/४९९ दिनांक : २४/०८/२०१५

प्रति,

**प्रधान सचिव (जसंप्र व वि),**
जलसंपदा विभाग, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

[लक्ष्यवेध - डॉ. संजय बेलसरे, उपसचिव (लपा)]

विषय : दिवशी (बु) साठवण तलाव, ता. भोकर, जि. नांदेड यास विशेषबाब म्हणून प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

25/8
P.A to P.S (WR)

संदर्भ : जलसंपदा विभागाचे पत्र क्र. विकाक-२११५/(९/२०१५) लपा-२ दि. १३/०८/२०१५.

संदर्भीय पत्रान्वये मा. श्री. अशोक चव्हाण, लोकसभा सदस्य यांनी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना विषयांकित प्रकरणी लिहिलेल्या दि. १०/०३/२०१५ च्या पत्राच्या अनुषंगाने शासनास अभिप्रायासह अहवाल पाठविण्याविषयी विनंती केलेली आहे.

विषयांकित प्रकल्प मु. अ. (जसं) जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांनी दि २४/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी पाठविला होता. मा. राज्यपाल यांचे वर्ष २०११-१२ च्या निदेशानुसार नांदेड जिल्ह्यामध्ये सिंचन अनुशेष नसल्याने तसेच सदर निदेशातील परि. २२ आणि २८ अन्वये फक्त विदर्भातील गोदावरी खोरेमधील प्रकल्पांना शेल्फवर ठेवण्यासाठी वैधानिक मान्यता देण्याविषयीचे निदेश असल्याने, प्राधिकरणाने, सदर प्रकल्पाचा प्रस्ताव दि. २९/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये परत पाठविला होता.

मा. राज्यपाल यांचे वर्ष २०१५-१६ च्या निदेशानुसार परि. १७ अन्वये *"जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पावरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पाचे काम हाती*

*घेऊ नये"*. यासंदर्भात सदर प्रकल्पावर राज्य शासनाने अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याविषयी कोणतीही कागदपत्रे प्राधिकरणाकडे सादर केलेली नाहीत. तदनुसार प्राधिकरण सद्यस्थितीमध्ये सदर प्रकल्पास मान्यता देऊ शकत नाही.

तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय यांचे औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्र. १२४ /२०१४ प्रकरणी दि. १३/०७/२०१५ रोजी असे आदेश दिले आहेत कि *"जोपर्यंत एकात्मिक राज्य जलआराखडा अंतीम होत नाही आणि अधिनियमान्वये विहित केलेल्या पद्धतीनुसार प्रकल्पाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर होत नाही तोपर्यंत शासनाने कोणत्याही नवीन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देऊ नये."*

उपरोक्त मर्यादांचा विचार करता सद्यस्थितीमध्ये विषयांकित प्रकल्पास मजनिप्रा अधिनियम कलम ११(च) अन्वये मान्यता देऊ शकत नाही.

o/c

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव

E:\MYDOCS\mydocs\Project Clearance\GMIDC\79.docx